क्र.व्हीएलएस- १०९९/(२६०)/प्राशि-३.
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक १७ फेब्रुवारी, १९९९.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे.

**विषय** : सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...

शासनपत्र-१०९९/(१३२/९९)/प्राशि-३, दिनांक १८ नोव्हेंबर, १९९९ अन्वये देण्यात आलेले आदेश रद्द करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

"सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधार तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस त्यांच्या समोरील दर्शविलेल्या ठिकाणी सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात इयत्ता १लीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इयत्ता माध्यमाव्यतिरिक्त खाजगी प्राथमिक शाळेस विना अनुदान तत्वावर शाळा सुरु करण्यास (जून, १९९९ पासून) परवानगी देण्यात येत आहे."

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, ४८/२अ, एरंडवणा, पौड रोड, पुणे-३८. | आकुर्डी प्राधिकरण, पुणे. | मराठी. |

सदर परवानगी शासन पत्र क्रमांक:व्हीएलएस- १०९९/(२६०)/प्राशि-३, दिनांक ४ मे, १९९९ मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तींवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच शासनपत्र दिनांक ४ मे, १९९९ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे प्राथमिक विद्यालय, जा.क्र..... प्राधिकरण आकुर्डी, पुणे - ४४, मराठी माध्यम

(दि. व. चिंदरकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

RECEIVED, 2 MAR 2000, रजिस्ट्रार

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
2 MAR 2000 २) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे.